जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद
(उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्र.०२४७२-२२७३०१ Email id:- rdc1osmanabad@gmail.com फॅक्स क्र.०२४७२-२२८०१८

संदर्भ:-१. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८ /आरोग्य ५दिनांक १४ मार्च २०२०

२. मा. प्रधान सचिव , सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचे पत्र करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दिनांक १४ मार्च २०२०

---

जा.क्र.२०२०/उपचिटणीस/एमएजी-३/सीआर-२६

दि. २९/०३/२०२०

विषय:- उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणू (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजाराचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत

**आदेश:-**

ज्याअर्थी संदर्भ क्रमांक १ अन्वये जिल्हाधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात (कोव्हिड १९) या संसर्गजन्य आजारावर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे. त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषीत केले आहे.

त्याअर्थी उस्मानाबाद जिल्हयात करोना विषाणूचा प्रादुर्भाव (कोव्हिड १९) रोखण्यासाठी प्रतिबंधक उपाययोजनेचा एक भाग म्हणून नागरिकांची एका ठिकाणी होणारी गर्दी रोखण्यासाठी उस्मानाबाद जिल्हयातील **दैनंदिन भाजीपाला विक्रीची ठिकाणे/मंडई, भाजी मार्केट याठिकाणी भाजी विक्रेत्यांनी सकाळी ७.०० ते ११.०० या कालावधीतच भाजीपाला विक्री करावा व सकाळी ११.०० नंतर घरोघर फिरुन भाजीपाला विक्री करावा, असे आदेशित करण्यात येत आहे. तसेच दैनंदिन भाजीपाला विक्रीची ठिकाणे/मंडई, भाजी मार्केट याठिकाणी सकाळी ७.०० ते ११.०० या कालावधीत भाजीपाला विक्रेते यांना एकमेकांपासून पुरेसे अंतर ठेवून बसता यावे तसेच याठिकाणी ग्राहकांनाही गर्दी न करता एकमेकांपासून पुरेसे अंतर ठेवून भाजीपाला खरेदी करता यावा यासाठी नागरी भागात मुख्याधिकारी नगर परिषद/नगर पंचायत व ग्रामीण भागात संबंधित ग्रामपंचायतीने भाजी विक्रेत्यांना जागा उपलब्ध करुन देणेबाबत तसेच याठिकाणी वेळोवेळी स्वच्छता करणेबाबत उचित कार्यवाही करावी असे आदेशित करण्यात येते.**

या आदेशाची अंमलबजावणी होत असलेबाबत खात्री करुन त्याबाबतचा अहवाल जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद व उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा. पं., स्वच्छता व पाणीपुरवठा) यांनी जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करावा.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना महाराष्ट्र कोव्हीड १९ उपाययोजना नियम २०२० चे नियम ११ नुसार भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ मधील तरतुदीनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

२९/३/२०

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रतिलिपी, माहिती व आवश्यक कार्यवाहीस्तव.**

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद उस्मानाबाद

२. पोलिस अधिक्षक, उस्मानाबाद यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

Scanned by CamScanner

३. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, उस्मानाबाद.
४. जिल्हा शल्य चिकीत्सक, उस्मानाबाद
५. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. उस्मानाबाद
६. जिल्हा प्रशासन अधिकारी, न.पा.प्र.जि.का. उस्मानाबाद
७. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद
८. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा.पं./स्वच्छता व पाणीपुरवठा जि.प. उस्मानाबाद
९. उपविभागीय दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१०.तालुका दंडाधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
११. गट विकास अधिकारी, सर्व जिल्हा उस्मानाबाद
१२. मुख्याधिकारी, नगर पालिका, उस्मानाबाद, तुळजापूर, उमरगा, लोहारा, मुरुम, भुम, परंडा, वाशी , कळंब यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

29/3/20

जिल्हादंडाधिकारी, उस्मानाबाद

Scanned by CamScanner